| MHBU070015182022 | CNR NO: MHBU070015182022 |
|---|---|
| | नि.फौ.प्रकरण क्र.१७१/२०२२ |
| | सरकार -वि- श्याम सुधाकर इंगळे |

निशाणी क्र. १५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदार ओम अशोक साकरकार यांनी दाखल केला. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी सादर केलेला अहवाल पाहिला. अर्जदाराने पटलावर, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर केली आहे. या कागदपत्राच्या अवलोकनार्थ अर्जदार हा जप्त हिरो एक्सट्रीम या मोटार सायकल क्र. एम.एच २८ ए.पी. २३९५, चेचिस क्र. MBLKC12EMFGF03614 इंजिन क्र KC12EFFGF04749 चा तो सदर वाहनाचा योग्य मागणीदार वाटतो.

२) विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहन सुपुर्तनाम्यावर देण्यात येऊ नये असा खुलासा नोंदविला.

३) सदर जप्त वाहन पोलीस ठाण्यात तसेच पडून राहील्यास सदर वाहनाचे नुकसान होवू शकते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई देसाई -वि- गुजरात राज्य, २००२ Supp (3) SCR, 39 या निर्णयविधीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार मी अटी व शर्तीवर खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, शेगाव शहर यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी अपराध क्रमांक १८५/२०२२ मध्ये जप्त हिरो एक्सट्रीम या मोटार सायकल क्र. एम.एच २८ ए.पी. २३९५, चेचिस क्र. MBLKC12EMFGF03614 इंजिन क्र KC12EFFGF04749 अर्जदार ओम अशोक साकरकार यांना, रु ५०,०००/- च्या ( अक्षरी पन्नास हजार मात्र ) सुपूर्तनामा बॉण्डवर, ताबडतोब दयावे.

३. तपास अधिकरी यांनी अर्जदाराच्या खर्चाने सदरहू वाहनाचे फोटो काढून त्याचा रितसर पंचनामा करुन ते दोषारोपपत्रासोबत जोडावे.

४. साक्षी पुराव्याचे वेळी आवश्यकता वाटल्यास अर्जदाराला सदरहू वाहन न्ययालयासमक्ष हजर करावे लागेल.

५. अर्जदाराने प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत सदरहू वाहनामध्ये कोणत्याही प्रकारचे फेरबदल करु नये किंवा वाहनाची विल्हेवाट लावू नये.

स्वा/-

दिनांक :- २२.११.२०२२

( जे. आर. घाडगे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ ले कोर्ट शेगांव.

CNR NO: MHBU070015182022

नि.फौ.प्रकरण क्र.१७१/२०२२
सरकार वि श्याम इंगळे
निशाण क्र. १५ खालील आदेश

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के.एस.देशमुख ,ग्रेड–३(तदर्थ)
न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,दुसरे कोर्ट, शेगांव.
दिनांकः– २२.११.२०२२.